प्रेसनोट दि. १२/०७/२०१९

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे शहर

## अभिरुची पोलीस चौकीचे हद्दीतील युनिटी वेलनेस क्लब येथे कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जनजागृती

आज दि. १२/०७/२०१९ रोजी सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत अभिरुची पोलीस चौकी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक ए.आर.कर्चे, पोना ७८५५ रेवननाथ भुजबळ यांनी कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने धायरी भागातील युनिटी वेलनेस क्लब या ठिकाणी भेट देवुन उपस्थित क्लब मेंबर यांना पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थितांना माहीती सांगण्यात आली. त्यांच्या भागातील समस्या जाणुन घेतल्या तसेच त्यांना भरोसा सेल, बडी कॉप, सुरक्षा ॲप, दामिनी पथक याबाबत माहिती देवुन सायबर क्राईम, लहान मुलांचे अपहरण, महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणारा छळ यास कसा प्रतिबंध करावा याबाबत मार्गदर्शन केले.

